शनिवार, दि. ०३ डिसेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १२८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282



# दर्पण दिन (दि ६ जानेवारी)

## सन्मान पत्रकारितेचा सत्कार पत्रकारांचा

ज्येष्ठ पत्रकारांचा सह परिवार सत्कार, उदयोन्मुख संपादकांचा सत्कार, सर्व पत्रकार - जाहिरात प्रतिनिधी, प्रेस फोटोग्राफर यांचा सत्कार, डिटीपी ऑपरेटर, वृतपत्र विक्रेते, एजन्सीधारक, पेपर वाटप करणाऱ्यांचा सत्कार

## दै. त्रिकाल संघर्षचे लोकार्पण

**स्थळ : भारती लॉन्स, राजुर रोड, जालना**

**मंगळवार, दि. ६ जानेवारी २०२६, वेळ सकाळी १० वा.**

आयोजक

**दीपक शेळके, बाबासाहेब आटोळे, दर्पण सकलेचा, गणेश काबरा, शेख चांद पी.जे., आमेर खान, सुहास वैद्य, प्रा. दत्ता देशमुख, शेख अशफाक, बाबुजी तिवारी, शेख चांद पी.जे., बाबासाहेब कोलते, सुनील भारती, शाहरुख शेख, आशिष तिवारी, प्रदीप देशमुख, जीवन काळे, माणिक जैस्वाल, योगेश देशमुख, दिनेश नंद, नरेंद्र जोगड, योगेश काकफळे, सुनील नरवडे, शेख मुजीबुद्दीन, सलमान सय्यद, निकीता काळे, शेख महेजबीन.**

मार्गदर्शक - अंकुशराव देशमुख, विजयकुमार सकलेचा, विनायक दहातोंडे, रवींद्र बांगड, महेश जोशी, लक्ष्मण राऊत, गुलाब पाटील, संजय भरतीया, बद्रीनाथ टेकाळे.

**पदाधिकारी, सदस्य व सभासद प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र, जालना**

संपादकीय पान

# पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले

महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांची आज म्हणजे जयंती आहे. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी साताऱ्याजवळील नायगाव या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई तर वडिलांचे नाव खंडूजी नेवसे असे होते. त्यांचे वडील गावचे पाटील होते. ज्या काळात स्त्रियांना घराच्या बाहेर पडायचे बंधन होते, त्याकाळात सावित्रीबाईंचा जन्म झाला. असे असले तरी सावित्रीबाई मात्र निडर स्वभावाच्या होत्या. त्या लहान असतांना एका दुबळ्या मुलाचे फुले पळवणाऱ्या धटिंगणाला त्यांनी अद्दल घडवली होती तसेच त्यांच्या घरासमोरील झाडावर असणाऱ्या घरट्यातील पक्षांची अंडी खाणाऱ्या नागाला त्यांनी ठेचून मारले होते. वयाच्या नवव्या वर्षी त्यांचा विवाह महात्मा जोतीराव फुले यांच्याशी झाला. जोतीराव तेंव्हा तेरा वर्षाचे होते. त्याकाळी बालविवाहाची परंपरा होती, अगदी पाळण्यात देखील विवाह लावले जायचे. महात्मा जोतीराव फुले म्हणजे महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारक. जोतीरावांना मातृप्रेम लाभले नाही. त्यांच्या मावस भगिनी सगुणा यांनी त्यांचा सांभाळ केला. सगुणा इंग्रज अधिकाऱ्याकडे दाई म्हणून काम करायच्या त्यामुळे त्यांना इंग्रजी कळायचे. आपल्या जोतीरावने देखील इंग्रजी फाडफाड बोलले पाहिजे असे त्यांना वाटायचे. त्यांनी जोतीरावांना शिकण्यास प्रेरित केले. जोतीरावही शिकले नंतर जोतिरावांनी सावित्रीबाई यांनाही शिकवले. मुलींच्या शिक्षणाचे महत्व जाणून मुलींसाठी शाळा काढण्याचा निर्णय त्यांनी घेतला. ते नेहमी म्हणत एक मुलगी शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते म्हणून १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. या शाळेत सावित्रीबाई फुले मुख्याध्यापक म्हणून काम पाहू लागल्या. या शाळेत सुरवातीला दोन मुली होत्या वर्षअखेर या शाळेतील मुलींची संख्या ४० ते ४५ पर्यंत पोहचली. या शाळेमुळे शूद्र समजल्या जाणाऱ्या स्त्री वर्गास ज्ञानाची कवाडे खुली झाली. पण हे चांगले काम त्याकाळातील सनातनी वर्गास रुचले नाही. मुली शाळेसाठी घराबाहेर पडू लागल्याने धर्म बुडाला अशी आरोळी ठोकत या सनातनी लोकांनी सावित्रीबाई व जोतीरावांच्या या महान कार्यास विरोध केला. सावित्रीबाई फुले यांच्या अंगावर शेण गोळे फेकले. काहींनी तर अंगावर हात टाकण्याचाही प्रयत्न केला पण फुले दांपत्य डगमगले नाही. घेतलेला वसा त्यांनी सोडला नाही. कितीही विरोध झाला तरी ध्येयापासून ते विचलित झाले नाही. जिद्दी व ध्येयवादी फुले दांपत्यांनी ज्ञानदानाचे आपले पवित्र कार्य चालूच ठेवले. जोतिरावांनी काढलेल्या शाळेत फुले दांपत्य व अन्य शिक्षक जीव ओतून शिकवत. विद्यार्थ्यांशी ते एकरूप होत त्यामुळे त्यांच्या शाळेची प्रगती लक्षणीय होती. त्यांच्या शाळेविषयी पुणे ऑब्जर्व्हर या दैनिकामध्ये २१ मे १८५२ मध्ये लिहिले होते, जोतीराव फुलेंच्या शाळेतील मुलींची संख्या सरकारी शाळेतील मुलांच्या संख्येपेक्षा दहा पटीने जास्त आहे कारण या शाळेत मुलींना शिकवण्याची जी व्यवस्था आहे ती मुलांच्या शासकीय शाळेपेक्षा चांगली आहे. १८६३ मध्ये फुले दांपत्यांनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. सावित्रीबाई त्याच्या प्रमुख होत्या. १८८५ पर्यंत ३५ विधवा ब्राह्मण स्त्रिया त्यांच्याकडे आल्या. त्यांची बाळंतपणे सावित्रीबाईंनी केली. १८७४ साली काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवा त्यांच्या घरात आल्या. या काशीबाईच्या मुलाला त्यांनी दत्तक घेतले त्या मुलाचे नाव यशवंत ठेवले. यशवंतला शिकवून त्यांनी डॉक्टर बनवले. सण १८७७ साली महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला. या दुष्काळात फुले दांपत्यांनी लोकांना खूप मदत केली. त्यांनी दुष्काळग्रस्तांसाठी जेवणाखाण्याची सोय केली. सावित्रीबाईंनी केशवपन पद्धत बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करुन नाभिकांचा संप घडवून आणला. पुनर्विवाहाचा कायदा व्हावा यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. महात्मा फुलेंनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची धुरा त्यांनी समर्थपणे वाहिली. सावित्रीबाई फुले या मोठ्या साहित्यिकही होत्या. काव्यफुले व बावनकशी सुबोध रत्नाकर हे काव्यसंग्रह त्यांनी लिहिले. १८९६-९७ साली पुण्यात प्लेगने धुमाकूळ घातला होता. प्लेग या जीवघेण्या आजाराने अनेकांचा जीव घेतला. हा रोग संसर्गजन्य आहे हे माहीत असूनही सावित्रीबाईंनी प्लेग पीडितांसाठी पुण्याजवळ दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांची सेवा करु लागल्या. त्यांना आधार देऊ लागल्या. प्लेगच्या रोग्यांची सेवा करताना सावित्रीबाईंनाही प्लेगची लागण झाली त्यातून १० मार्च १८९७ रोजी त्यांचे निधन झाले. सावित्रीबाई फुले यांचे कार्य समस्त मानवजातीला भूषणावह आहे म्हणूनच जयंतीदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार, दौंड पुणे, ९९२२५४६२९५**

# बलात्कारी कुलदीप सेंगरला तुरुंगात नाही, तर फासावर लटकवायला हवे

उन्नाव बलात्कार प्रकरणी सुप्रीम कोर्टाने हायकोर्टाच्या निर्णयाला स्थगिती दिल्यानंतर पीडित महिला व त्यांच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले.कारण सेंगरच्या जामिन अर्जावर स्थगिती आल्याने सध्याच्या परिस्थितीत त्यांच्या पळवाटांवर अंकुश लागला आहे.परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की राजकीय पुढाऱ्यांच्या अशा घृणास्पद केसचा निकाल कासवाच्या गतीने का चालतो किंवा का लांबविल्या जातो हा मोठा गंभीर आणि गहन प्रश्न आहे.कारण सर्वसामान्यांच्या केसमध्ये सरकार व कायदा तडकाफडकी निर्णय घेतो आणि निर्णय लावतो ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.परंतु आपण ज्याला लोकप्रतिनिधी, आमदार म्हणतो असे माजी आमदार कुलदीप सेंगर यांच्या बलात्कार केस प्रकरणाला तब्बल आठ वर्षे पुर्ण झालीत म्हणजे तब्बल २९२० दिवस तरीही पीडितेला अजुन पर्यंत योग्य न्याय मिळालेला नाही ही दुर्भाग्यपुर्ण बाब आहे.उन्नाव बलात्कार प्रकरण जर फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून चालविले असते तर आतापर्यंत सेंगर फासावर लटकला असता.सर्वांनाच कल्पना आहे की सेंगर दोषी आहे. परंतु सरकारने जर जातीने पुढाकार घेतला असता तर सेंगरला केंव्हाच फाशी झाली असती हेही तितकेच सत्य आहे..परंतु सरकार सुध्दा सेंगरला वाचविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते.सरकारने हेही लक्षात ठेवले पाहिजे की,एका बलात्कारी सेंगरला जर ताबडतोब फाशी झाली तर देशातील राजकीय वर्तुळात भुकंप येईल व बलात्कार प्रकरणावर अंकुश लागेल हेही तितकेच सत्य आहे.राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की काही लोक सत्तेच्या पडद्याआड अनेक घृणास्पद कृत्य करीत असतात.तेच काम कुलदीप सेंगरने सत्तेमध्ये असतांना २०१७ मध्ये केले.परंतु आताही उन्नाव बलात्कार प्रकरणातील आरोपी यांच्यावर अजून पर्यंत कठोर शिक्षा ठोठावण्यात आलेली नाही हे दुर्भाग्यच म्हणावे लागेल. देशाती कोणतेही बलात्कार प्रकरण असो अशा केसेसचा निकाल फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून चालायला पाहिजे व यात ताबडतोब फाशीच्या शिक्षेचे प्रावधान असणे गरजेचे आहे.कारण कुलदीप सेंगर सारखे असे हजारो राजकीय पुढारी आहेत की आपल्या सत्तेचा,संपत्तीचा आणि अधिकाराचा गैरवापर करून घृणास्पद कृत्य करीत असतात. २०१७ च्या उन्नाव बलात्कार प्रकरणात मोठा निर्णय घेतांना सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली हायकोर्टाच्या त्या आदेशाला स्थगिती दिली, ज्यामध्ये अल्पवयीन मुलीवरील बलात्कार प्रकरणी दोषी आणि भाजपमधून हकालपट्टी करण्यात आलेले कुलदीप सेंगर यांची जन्मठेपेची शिक्षा स्थगित करण्यात आली होती. अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणारा नराधम कुलदीप सेंगर याच्या केसचा ताबडतोब निर्णय लावून फाशीच्या शिक्षेचीच मागणी मुख्यत्वे करून सरकारकडून व इतर संपूर्ण राजकीय स्तरातून व्हायला पाहिजे.आता सरकारने वेळ न घालवता उन्नाव बलात्कार प्रकरणातील ठोस पुरावे पहाता पीडीतेला न्याय देण्याच्या उद्देशाने सामोर येण्याची गरज आहे जेणेकरून नराधम बलात्कारी कुलदीप सेंगर याला लवकरात लवकर फाशीची सजा होईल.कारण कुलदीप सेंगरच्या या घृणास्पद कृत्य पहाता सर्वच स्तरातून फाशीच्या शिक्षेची मागणी होत आहे.त्यामुळे सन्माननीय सर्वोच्च न्यायालय यांना माझी नम्र विनंती आहे की उन्नाव बलात्कार प्रकरणाचा निकाल लवकरात लवकर लावून नराधम सेंगरला फासावर लटकविला पाहिजे. तेव्हाच पीडीतेला योग्य न्याय मिळेल व लोकशाहीला नवी दिशा मिळेल.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## पंढरीच्या वारीचा अनुभव रविवारी घ्या मुंबईमध्येच

**मुंबई । प्रतिनिधी** - पंढरपूरच्या वारीतील अनुभव घ्यायचा आहे, परंतु या वारीत सहभागी होता येत नाही, अशी अतृप्त इच्छा राहिलेल्या भाविकांना पंढरीच्या वारीचा अनुभव येत्या रविवारी मुंबईतच घेता येणार आहे. श्री वारकरी प्रबोधन महासमितीच्या वतीने हा सोहळा रविवारी कॉटनग्रीन राम मंदिर ते वडाळा विठ्ठल मंदिर यादरम्यान होणार आहे. या सोहळ्यात मुंबई, ठाणे, रायगड या जिल्ह्यातील वारकरी मोठ्या संख्येने सहभागी होतात. ज्यांना पंढरीचा सोहळा अनुभवाचा आहे त्यांनी या सोहळ्यात जरूर सहभागी व्हावे, असे आवाहन श्री वारकरी प्रबोधन महासमितीच्या वतीने करण्यात आले आहे.

पंढरपूरची आषाढी वारी महाराष्ट्राचा सांस्कृतिक, अध्यात्मिक आणि ऐतिहासिक वारसा आहे. या वारीत सहभागी होता यावं, अशी प्रत्येक मराठी माणसाची इच्छा असते, परंतु घड्याळाच्या काट्यावर चालणाऱ्या मुंबई शहरातील नागरिकांना या वारीत सहभागी होण्या एवढा वेळ मिळत नाही. म्हणूनच गेल्या २६ वर्षांपासून मुंबईत श्री पांडुरंगाचा पालखी सोहळा आयोजित केला जातो. यावर्षी रविवार, दि. ४ जानेवारी २०२६ रोजी हा सोहळा निघणार आहे. या सोहळ्यात मोठ्या प्रमाणात वारकरी सहभागी होतात. टाळ मृदंगाच्या गजरात हा सोहळा कॉटन ग्रीन येथील राम मंदिरातून निघून वडाळा येथील विठ्ठल मंदिरात त्याचा समारोप होतो. जसे पंढरपूरच्या वारीमध्ये घोड्याचे गोल रिंगण होतं, फुगड्या होतात तसा सर्व सोहळा दरवर्षी होत असतो.

वारकरी संप्रदायाच्या वैचारिक ऐश्वर्याचे दर्शन मुंबई शहरात येणाऱ्या भारतातील आणि विदेशातील पर्यटकांना व्हावं, तसेच इथे राहणाऱ्या परप्रांतीय लोकांनाही वारकरी संप्रदायाचा हा वारसा कळवा यासाठी २६ वर्षांपूर्वी हा सोहळा सुरू करण्यात आला. पंढरपूरच्या वारीमध्ये ज्याप्रमाणे दिंड्यांना क्रमांक दिले जातात त्याप्रमाणे इथेही दिलेल्या क्रमांकावरच दिंड्या चालतात. या सोहळ्यापूर्वी सात दिवस कॉटन ग्रीन राम मंदिर येथे कीर्तन महोत्सवाचे आयोजन केले जाते. या कीर्तन महोत्सवात दिपालीताई झुमके कल्याण, महादेव महाराज मोरे घाटकोपर, सुप्रियाताई साठे आळंदी, केशव महाराज भागडे इगतपुरी, डॉ. विवेक महाराज चव्हाण आळंदी, महेंद्र महाराज भगवान गडकर यांची कीर्तने होणार आहेत. पालखी सोहळ्याच्या पूर्व संध्येला वारकरी प्रबोधन महासमितीच्या वतीने विश्वस्थापकी एक जण कीर्तन सेवा समर्पित करतात. या कीर्तन सेवेत श्री वारकरी प्रबोधन समितीच्या गेल्या २६ वर्षाच्या वाटचालीचा आढावा घेत असतानाच वारकरी संप्रदायाच्या प्रगल्भ विचाराचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी भविष्यात काय उपक्रम राबविले जाणार आहेत याचा आढावा घेतला जातो. यावर्षी हे कीर्तन श्री वारकरी प्रबोधन महा समितीचे सहसचिव ह. भ. प. शामसुंदर महाराज सोन्नर करणार आहेत. रविवारी सकाळी सुजाताई गोपाळे यांचे कीर्तन होईल. त्यानंतर येथे संत संमेलन आणि पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होईल. त्यानंतर पांडुरंगाच्या पालखी सोहळ्याला प्रारंभ होईल, अशी माहिती वारकरी प्रबोधन महा समितीच्या वतीने देण्यात आले.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या 'विशाखा काव्य पुरस्कार - २०२५' साठी कवितासंग्रह पाठविण्याचे आवाहन

**नाशिक । प्रतिनिधी** - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनामार्फत नवोदित कवींकडून सन २०२५ च्या विशाखा काव्य पुरस्कारासाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. यानुसार इच्छुक कवींनी सन २०२५ मध्ये प्रकाशित झालेला आपला पहिला मराठी काव्यसंग्रह येत्या ३१ जानेवारी २०२६ पर्यंत विद्यापीठात 'प्रमुख - कुसुमाग्रज अध्यासन' या पत्त्यावर केवळ टपालाद्वारे पाठवावा, असे आवाहन कुसुमाग्रज अध्यासनातर्फे करण्यात आले आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या नावाने स्थापित अध्यासनामार्फत, त्यांच्या सुप्रसिद्ध 'विशाखा' या काव्यसंग्रहाच्या नावाने नवोदित कवींच्या मराठी भाषेतील प्रथम काव्यसंग्रहास दरवर्षी पुरस्कार दिला जातो. यंदा विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली या पुरस्काराची नियमावली निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत प्रकाशित झालेल्या काव्यसंग्रहांमधून अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

या पुरस्कारासाठी अर्ज करण्यासाठी कोणतेही प्रवेश शुल्क आकारले जाणार नाही. सादर करण्यात येणारा काव्यसंग्रह केवळ मराठी भाषेतील असावा व त्यावर प्रकाशन वर्ष ठळकपणे मुद्रित केलेले असणे आवश्यक आहे. तसेच, संबंधित काव्यसंग्रहाची यापूर्वी कोणतीही ई-आवृत्ती प्रकाशित झालेली नसावी. पुरस्कारासाठी कवी स्वतः किंवा संबंधित प्रकाशक अर्ज पाठवू शकतात.

अर्जासोबत काव्यसंग्रहाच्या पाच प्रती, कवीची पासपोर्ट आकाराची दोन छायाचित्रे, सविस्तर परिचयपत्र तसेच हा काव्यसंग्रह कवीचा प्रथमच प्रकाशित झालेला असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे. प्रतिज्ञापत्र संलग्न नसल्यास संबंधित काव्यसंग्रह पुरस्कारासाठी विचारात घेतला जाणार नाही. प्रतिज्ञापत्राचा नमुना विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. परिचयपत्रामध्ये कवीचा संपूर्ण पत्ता, ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नमूद केलेला असावा.

काव्यसंग्रह केवळ टपालाद्वारेच पाठवावेत. खाजगी कुरीयर सेवेद्वारे पाठविलेले काव्यसंग्रह स्वीकारले जाणार नाहीत. पाकीटावर 'विशाखा काव्य पुरस्कारासाठी' असा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. या पुरस्कारासंबंधी विद्यापीठ व निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

या पुरस्कारासाठी पात्र व इच्छुक कवींनी आपला काव्यसंग्रह ३१ जानेवारी २०२६ पर्यंत प्रमुख,
कुसुमाग्रज अध्यासन,
ज्ञान स्रोत केंद्र इमारत, पहिला मजला,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
गोवर्धन, नाशिक - ४२२२२२
या पत्त्यावर केवळ टपालाद्वारे पाठवावा. अधिक माहिती व सविस्तर नियमावलीसाठी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळास भेट द्यावी, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. गोविंद कतलाकुटे व कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी केले आहे.

# फुले दांपत्याच्या संघर्षाची फळे आजच्या महिला चारवत आहेत परंतु कर्मकांड अंधश्रद्धा मध्येच अडकल्याचे दिसतात का ?

### क्रांती ज्योती सावित्री बाई फुले यांच्या १९५ व्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन

क्रांती ज्योती सावित्री बाई फुले यांचा जन्म ०३/०१/१८३१ सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे खंडोजीराव नेवसे पाटील यांच्या कुटुंबात झाला खंडोजी राव हे एक प्रतिष्ठित व्यक्ती म्हणून काम करत होते ते रोजच सामाजिक कौटुंबिक वाद निपटावीत होते आणि आपल्या वडिलांचा हा न्याय निवाडा सावित्री बाई लहानपणापासूनच बघत होत्या महिला वरील अत्याचार पुरुष प्रधान संस्कृती धर्माधिष्ठित व्यवस्थेने सर्वच समाजाला ग्रासलेले होते, अशाच वेळी त्यांचा विवाह महात्मा ज्योतिराव फुले यांच्याशी झाला. महात्मा ज्योतिराव फुले यांच्याही डोक्यामध्ये समाजपरिवर्तनाचे वारे सुरू होते, ब्राह्मण्य वादामध्ये वर्ण व्यवस्था प्रचलित होती, महिलांना शूद्र अतिशूद्र समजल्या असल्याने त्यांना शिक्षण घेण्यास बंदी लहान वयात पतीच्या निधनानंतर आयुष्यभर विधवेचे जीवन जगणे सती पद्धती या सर्व रूढी परंपरा मानवतावादी धोरणाच्या विरुद्ध आहे स्त्री ही देखील माणूसच आहे आणि माणसाला माणसा सारखे जगता आले पाहिजे या साठी एक मोठा सामाजिक लढा उभारला पाहिजे म्हणून मुलींना शिक्षण देण्यासाठी एक महिला शिक्षिका ची गरज आहे म्हणून त्यांनी सावित्रीची निवड केली आणि शेतात काम करता करता जमिनीची पाटी व काठी ची लेखणी या सहाय्याने सावित्रींना अ, ब, क, ड शिकविले महिला जर शिकली तर अन्यायाच्या विरोधात पेटून उठेल समाजातील वाईट रूढी परंपरांना छेद देण्याचे काम सत्य शोधण्याचे काम महिला चांगल्या पद्धतीनं करू शकते व तिने जर सत्य शोधलं तर समाज परिवर्तन होण्यास वेळ लागणार नाही असा



फुले दांपत्याचा पूर्ण विश्वास झाला आणि म्हणून पुणे येथे ०१ जानेवारी १८४८ भिडेच्या वाड्यात मुलींची पहिली शाळा काढली सुरुवातीला कोणत्याही समाजाच्या मुली शाळेत येण्यास धाडस केले नाहीत परंतु पाच सात मुली फातिमा शेख सहित शिकायला येऊ लागल्या परंतु ब्राह्मण वाद्यांच्या पोटात दुखायला लागले आणि हे फुले दांपत्य जे महिलांना शिकविण्याचे कार्य करत आहे ते खूप मोठे पाप आहे. धर्म बाटवण्याचे कार्य करत आहेत यांना येथेच रोकणे गरजेचे आहे नसता धर्म डुबेल, असा बोभाटा त्यांनी सुरू केला एव्हढेच नाही सावित्री बाईच्या अंगावर शेण फेकण्याचे, चिखल फेकण्याचे खरकटे पाणी फेकून शाळेत जाण्यासाठी रोखण्याचा प्रयत्न केला. एक वेळेस एका ब्राह्मण पुरुषाने सावित्री बाई वर हल्ला करण्याचा प्रयत्न केला परंतु मोठ्या हिंमतीने सावित्रीने त्याला उत्तर दिले. असा प्रचंड संघर्ष सावित्रीबाई रोजच करत होत्या त्या मुळे त्यांना एक शिल्लक साडी सोबत घेऊन शाळेत गेल्यावर बदलून विद्यार्थिनीला शिकविण्याचे कार्य करतंच होत्या. त्यांनी महात्मा ज्योतिराव फुले यांना सर्व त्रास सांगितला परंतु आपल्याला या संघर्षाला तोंड द्यावेच लागेल थांबता येणार नाही असा मंत्र आपल्या पत्नीला म्हणजे सावित्रीला दिला व त्याच जिद्दीने त्यांनी त्यांचे कार्य चालू ठेवले ब्राह्मण्यवादी एवढ्यावरच न थांबता ते ज्योतिराव फुले यांच्या घरी जाऊन त्यांच्या वडिलांना धमकावले तुमचा मुलगा आणि सून हे महिलांना शिक्षण देऊन धर्म बुडवत आहेत हे वेळीच थांबवा नसता तुमच्या कुटुंबाला बहिष्कृत करण्यात येईल व जीवे मारण्याचे ही धमकी दिली. म्हणून गोविंद रावांनी ज्योती रावांना खडसावून सांगितले तुझे हे काम थांबव नसता घराच्या बाहेर चालता हो, आणि या दांपत्याला घराच्या बाहेर जावे लागले कोणीही घरात राहायला देत नव्हते अशा वेळी शेख उस्मान नावाच्या व्यक्तीने घरामध्ये राहण्यास जागा दिली तेथूनच ते समाज परिवर्तनाचे काम मुलींना शिक्षण देण्याच्या कामाबरोबरच आपण काही कृती ही केली पाहिजे म्हणून मागासवर्गीयांना पाणी पिण्यासाठी खुला हौद केला विधवांना पुनर्विवाह करण्याचे कार्य केले सती प्रथा रोखण्याचे कार्य केले पुढच्या पिढ्यांना आपले सामाजिक परिवर्तनाचे कार्य चालू ठेवण्यासाठी पुस्तके लिहिली पाहिजे म्हणून गुलाम गिरी, ब्राह्मणांचे कसब शेतकऱ्यांचा असूड व इतर खूप सारे साहित्य पुढील पिढी साठी समाज परिवर्तनाची ज्योती पेटत रहावी या उद्देशाने खूप मोठे साहित्य निर्माण केले. या दांपत्याने प्रवाहाच्या विरुद्ध जाऊन समाज परिवर्तनाची चळवळ साठी आपले आयुष्य वाहिले. आज याच संघर्षांची फळे महिला चाखत आहे. महिला शिकली विद्वान झाली समाजकारणात राजकारणात आर्थिक धोरणात मुख्य घटक म्हणून आज काम करत आहे निर्णय घेण्याची क्षमता तिने स्वतः प्राप्त केली असून पुरुषांच्या बरोबरीने प्रगती साधली आहे अन्यायाच्या विरोधात स्त्री मुक्ती चळवळ हे त्यांचेच धोतक आहेत, सतीची प्रथा, बाल विवाह, विधवेचे पुनर्विवाह हे रोखण्याचे काम ह्या दांपत्याने केले, म्हणून आज या देशाची राष्ट्रपती महिला दिसत आहे, पंतप्रधान, खासदार, आमदार, होताना दिसत आहे परंतु स्त्री शिकली मोठी झाली परंतु कर्मकांड अंधश्रद्धा उपास तापास किंवा इतर रूढी परंपरा आजही त्या करताना दिसतात म्हणून महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतिज्योती सावित्री बाई फुले यांना अपेक्षित असलेली स्त्री पूर्णपणे महिला घडली का हा अजून प्रश्नच आहे म्हणून या दांपत्याचा संघर्षाची फळे महिला चाखत आहेत परंतु कर्मकांड अंधश्रद्धा मध्येच अडकलेल्याच दिसतात व आपली उद्धारकर्ती ही सावित्री बाई आहे यांना अपेक्षित असलेले काम आपण केले पाहिजे या मुद्द्यावर पूर्णपणे विश्वास आजच्या महिलात दिसत नाहीत हेच सत्य आहे. या जयंती निमित्ताने महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्री बाई फुले यांना अपेक्षित असलेली महिला निर्माण होतील अशी अपेक्षा करू. जय ज्योति जय क्रांति...

सुरेश खंडाळे
९४२२७९७१९१

# जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता वाढविण्याला प्राधान्य-सीईओ मित्रू

### जेईएफच्या पायाभूत शिक्षण व वाचन समृद्धी अभियानाची जाणून घेतली माहिती



**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा परिषद शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी आपली प्राथमिकता आहे. त्या अनुषंगाने सक्षम जालना अंतर्गत पहिल्या टप्प्यात यावर्षी जालना तालुक्यातील १० शाळांमध्ये जालना एज्युकेशन फाउंडेशनच्या माध्यमातून गुणवत्ता विकास अभियान राबविण्यात येत असून, आपले या कार्यक्रमावर अभियान पूर्ण होईपर्यंत वैयक्तिक लक्ष आहे. फाउंडेशन आणि शिक्षक यांच्या एकत्रित प्रयत्नातून या शाळा गुणवत्तेच्या बाबतीत मॉडेल बनतील, असा विश्वास जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मित्रू पी. एम. यांनी येथे बोलताना व्यक्त केला.

श्रीमती मित्रू यांनी शुक्रवार दि. २ जानेवारी रोजी जालना एज्युकेशन फाउंडेशनला भेट देऊन, जिल्हा परिषदेच्या १० शाळांमध्ये राबविण्यात येत असलेल्या अभियनाची माहिती जाणून घेतली. यावेळी झालेल्या चर्चेदरम्यान पायाभूत चाचणीचे निकाल, विद्यार्थ्यांचा वाचन स्तर उंचावणाऱ्या रीड अलाँग या उपक्रमाबाबत माहिती त्यांनी जाणून घेतली. प्रा. राहुल लाहोटी यांनी अभियानांतर्गत होणाऱ्या विविध चाचण्या, चार दिवसीय कृतीयुक्त शिबिरे, वाचन अभियान व विविध उपक्रमांची अंमलबजावणी प्रक्रिया प्रक्रियाप्रेझेंटेशनद्वारे विषद केली. जालना एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. सुरेश लाहोटी, सचिव सुरेश कुलकर्णी यांनी फाउंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात येणारी शिष्यवृत्ती योजना, मोफत कोचिंग, इंग्लिश स्पोकन, टॅली व बेसिक संगणक प्रशिक्षण, विज्ञान प्रयोगशाळा आदी विविध उपक्रमांची माहिती दिली. एकल पालकांच्या मुलांना बाल संगोपन योजनेचा लाभ मिळवून देण्यासह शैक्षणिक साहित्य किट देण्याच्या उद्देशाने पाल्यांची माहिती संकलित करण्यात येत असून, या उपक्रमाला जिल्हा परिषदेचे सर्वतोपरी सहकार्य राहील, अशी ग्वाही मित्रू यांनी दिली.

याप्रसंगी प्रा. स्वप्निल सारडा, दिलीप केंद्रे, रुक्मिणीकांत दीक्षित, हेमलता पेंबार्ती, भाग्यश्री गोमतीवाले, लक्ष्मी यादव, तेजस अग्रवाल यांची उपस्थिती होती.

### जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन समितीची बैठक संपन्न

# पाणी पुरवठा योजनांच्या कामांची त्रयस्थ संस्थेकडून झालेल्या तांत्रिक तपासणीतील त्रुटीची पुर्तता करावी - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना । प्रतिनिधी -** नागरिकांना पाणी उपलब्ध करुन देणे खुप पुण्याचे काम आहे. नळाद्वारे पाणी उपलब्ध झाल्याने ग्रामीण महिला वर्गाचे आयुष्य पुर्णतः बदलणार आहे. नागरिकांसाठी पाणी पुरवठा हा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. पुढील दहा वर्षाचा विचार करता जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर असलेली ग्रामीण पाणी पूरवठ्याची कामे वेळेत आणि गुणवत्तापुर्ण होणे गरजेचे आहे. जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनांच्या कामांची टाटा कन्सलटन्सी या त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक तपासणी करण्यात येत असून अहवालानूसार प्राप्त झालेल्या त्रुटीची पुर्तता तातडीने करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हास्तरावर स्थापन केलेल्या जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनची बैठक शुक्रवार दि.२ जानेवारी २०२६ रोजी पार पडली. या प्रसंगी त्या बोलत होत्या. या बैठकीस कार्यकारी अभियंता सर्जेराव शिंदे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अभियंता श्री.पाध्ये, उप अभियंता श्री.बोडखे, श्री.जवंजाळ, श्री.ठाकुर, स्वच्छता तज्ञ नम्रता गोस्वामी, उप कार्यकारी अभियंता पुजा बुलबुले, श्री.घोरपडे यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हा परिषदेमार्फत जिल्ह्यातील अंबड, बदनापूर, भोकरदन, घनसावंगी, जाफ्राबाद आणि जालना या तालूक्यासाठी जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पूरवठा योजनेची कामे मंजूर झालेली आहे. तर उर्वरीत १२० व ७० गावांसाठी परतूर व मंठा तालुक्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यंत्रणेद्वारे २ ग्रीड पाणी पूरवठा योजना राबविण्यात येत आहेत. कंत्राटदारानेही गुणवत्तेचे काम करणे आवश्यक असून योजनेतील निकषानूसार शाखा अभियंत्यांनी प्रत्यक्ष हजर राहत कामे काळजीपुर्वक करावी, कामात कसूर केल्यास हयगय केली जाणार नाही. या कामात समावेश असलेल्या उपअभियंता यांनी केवळ कागदोपत्री कामे न करता आठवडाभरात किमान ४ वेळा क्षेत्रभेट देवून कामाची तपासणी करावी. मी सुध्दा विविध तालुक्यातील कामांना भेट देवून पाहणी करणार आहे. तरी प्रत्येक कामांचे जिओ टॅगिंग छायाचित्र व व्हिडीओ अहवालासोबत सादर करावेत. दिलेल्या उद्दीष्टानूसार काम न केलेल्या अभियंता आणि कंत्राटदारविरुध्द कारवाई प्रस्तावित करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले आहेत

पाणी पुरवठा विभागामार्फत सद्यस्थितीत सुरु असलेल्या कामाबाबत माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी यावेळी दिली. यामध्ये जल जीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यात एकुण ७३३ कामे मंजूर असून अंबड-१३८, बदनापूर-८१, भोकरदन-१५५, घनसावंगी-११८, जाफ्राबाद-११४ आणि जालना -१२७ या प्रमाणे आहेत. यापैकी ३१५ कामे पुर्ण झाली असून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. तर ४०० उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. जिल्ह्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकमार्फत ७ कामे सुरु आहेत. यावेळी संपुर्ण स्वच्छता अभियानातंर्गत जिल्ह्यातील सुरु असलेल्या कामाचाही आढावा घेण्यात आला. या बैठकीस शिक्षण, कृषी, वने, भुजल सर्वेक्षण आदि विभागाचे अधिकारी उपस्थित होते.




# शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र शासन कटीबद्ध - केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान

### मुक्त विद्यापीठाच्या कृषी विज्ञान केंद्रातर्फे किसान सुसंवाद कार्यक्रम




**नाशिक । प्रतिनिधी -** देशातील सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यानुसार भारत सरकारचे कृषी मंत्रालय सोबत सिंचन, पशुपालन असे पूरक विभाग आणि देशातील कृषी विज्ञान केंद्रे कटीबद्ध आहेत. विकसित भारत - जी रामजी' यीजनेतून शेतीला पूरक कामे प्राधान्याने केली जाणार आहेत, असे प्रतिपादन केंद्रीय कृषी, शेतकरी कल्याण, ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी येथे केले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने आज दुपारी किसान सुसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. संजीव सोनवणे, प्र - कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्लीचे सहाय्यक महानिदेशक डॉ. राजश्री रॉय बर्मन, कृषि प्राद्योगिकी अनुसंधान संस्थान व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्लीचे संचालक डॉ. एस. के. रॉय, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. गोविंद कतलाकुटे, महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाच्या विस्तार व प्रशिक्षण भागाचे संचालक श्री. रफिक नायकवाडी, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्लीचे वैज्ञानिक डॉ. शाकीर अली सय्यद, कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. नितिन ठोके यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना पुढे केंद्रीय मंत्री श्री. चौहान म्हणाले की प्रत्येक शेतकऱ्यामध्ये आपण देव पाहतो. शेतकऱ्यांची सेवा ही ईश्वर सेवा आहे. कारण विज्ञानाने कितीही प्रगती केली तरी शेतकरी कष्ट करून जे उत्पादित करतो ते कुठलेही मशीन, ए. आय. किंवा रोबोट उत्पादित करू शकत नाही. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालासाठी प्रक्रिया केंद्रे (प्रोसेसिंग युनिट) साठी मदत केली जाईल. शेतकऱ्यांच्या हितासाठी केंद्र शासनाकडून अनेकविध योजना व उपक्रम राबविण्यात येत आहेत. परंतु दुर्दैवाने काही शेतकऱ्यांना त्यांची पूर्ण माहिती मिळत नाही तर काही योजनांमध्ये मर्यादा असते. शेतकरी मालावरील प्रक्रिया केंद्रे आणि अन्य विषयासंदर्भात आपण राज्यशासनाशी चर्चा करू असे आश्वासन त्यांनी दिले. देशातील लहरी हवामान किंवा शेतजमिनीचे कमी क्षेत्रफळ असणाऱ्या देशातील शेतकऱ्यांनी एकात्मिक शेती (इंटेग्रेटेड फार्मिंग) म्हणजे शेतीत फक्त एकच पीक न घेता, पिकांसोबतच पशुपालन, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, मधमाशीपालन, फळे - फुले आणि भाजीपाला यांसारख्या विविध पूरक व्यवसायांची सांगड घालावी असे आवाहन देखील त्यांनी आपल्या भाषणाच्या शेवटी केले. यावेळी नामदार श्री. चौहान यांच्या हस्ते मुक्त विद्यापीठाच्या कृषि विज्ञान केंद्रातर्फे उत्पादित 'यश मइक्रो - न्युट्रीएन्टस ग्रेड - २' या सूक्ष्म अन्नद्रव्य उत्पादनाचे लोकार्पण करण्यात आले.

यानिमित्ताने प्रदर्शित करण्यात आलेल्या महिला स्वयंसहायता बचत गट व शेतीसंदर्भातील स्टॉलला भेट देत महिला व शेतकरी वर्गाशी संवाद साधला. त्यानंतर त्यांच्या हस्ते कृषि विज्ञान केंद्र आवारात बहावा झाडाचे रोपण करण्यात आले. नामदार चौहान यांचे प्रत्यक्ष भाषण सुरु होण्यापूर्वी त्यांच्याशी पेठचे श्री. यशवंत गावंडे (शेतीमाल प्रक्रिया केंद्रे), जानोरीचे श्री. गणेश वाघ (फळबागा शीतगृह अनुदान), नाशिकचे श्री. रवींद्र अमृतकर (शेतीसाठी यांत्रिकीकारणाचा फायदा), अजमेर सौंदाणेचे श्री. नानाभाऊ पवार (कांदापीक) यांनी आपपाल्या विषयानुरूप संवाद साधला. मुक्त विद्यापीठ कृषि विज्ञान केंद्राच्या माजी विद्यार्थिनी व मशरूम उद्योजिका श्रीमती वैशाली उदार यांचा मंत्री श्री. चौहान यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. वंदे मातरम गीताने कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांनी केले. त्यांच्या हस्ते मंत्री श्री. चौहान यांचा स्वागतपर सत्कार करण्यात आला. डॉ. शाम कडूस पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले. कार्यक्रमास शेतकरी, बचतगट महिला व विद्यापीठ कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोलापूरात भाजपाच्या दोन गटात वाद

**सोलापूर -** महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सोलापुरात राजकीय वादातून भाजपमधील दोन गटात टोकाचा वाद झाल्याच चित्र पाहायला मिळालं. महापालिका निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी चांगलाच राडा झाला. सोलापुरातील जोशी गल्ली परिसरातील भाजपचे माजी नगरसेवक शंकर शिंदे यांचे संपर्क कार्यालय भाजपच्याच दुसऱ्या गटाने फोडले. आपल्या समर्थक उमेदवारास उमेदवारी न मिळाल्याच्या करणावरून दुसऱ्या गटाने कार्यालय फोडल्याचा आरोप करण्यात आला. यावेळी, पोलिसांनी (झेश्रळलश) मोठा बंदोबस्त लावून हस्तक्षेप केला. मात्र, येथील राड्यातच एका तरुणाची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. दरम्यान, या घटनेनंतर महापालिका परिसरातील घटनास्थळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात आहे. सोलापूर शहरात राजकीय वादातून एकाची हत्या करण्यात आली असून बाळासाहेब सरवदे असे हत्या झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

# नायगाव येथे अखंड हरीनाम साप्ताहास भक्तीमय वातावरणात सुरुवात

**मंठा । प्रतिनिधी -** नायगाव येथे पारंपरिक आणि श्रद्धेने जपला जाणारा अखंड हरीनाम साप्ताह मोठ्या भक्तीभावात सुरू झाला आहे. साप्ताहाच्या पहिल्याच दिवशी गावात हरिनामाच्या गजराने संपूर्ण परिसर भक्तीमय झाला.

या साप्ताहामध्ये अखंड नामस्मरण, भजन-कीर्तन, तसेच प्रवचनांचे आयोजन करण्यात आले आहे. विविध भागातून आलेले कीर्तनकार आणि भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत असून, धार्मिक वातावरण अधिकच पवित्र झाले आहे.

ग्रामस्थांच्या एकत्रित प्रयत्नातून आणि संयोजन समितीच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडत आहे. सामाजिक ऐक्य, संस्कार आणि अध्यात्मिक जागृती साधण्याच्या उद्देशाने हा अखंड हरीनाम साप्ताह आयोजित करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

या भक्तीमय सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### जालना शहरात 'तिसऱ्या डोळ्याची' करडी नजर

# चार महिन्यांत २,०९७ वाहन केसेस; २२.५७ लाखांचा दंड

### महिला पोलीस अंमलदारांच्या कामगिरीने वाहतूक शिस्तीत मोठा बदल

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील वाहतूक नियंत्रणासाठी उभारण्यात आलेली 'तिसरा डोळा' (CCTV आधारित नियंत्रण प्रणाली) ही संकल्पना आता केवळ तांत्रिक नव्हे, तर कार्यक्षम आणि परिणामकारक ठरत असल्याचे स्पष्ट चित्र समोर आले आहे.

या प्रणालीच्या माध्यमातून महिला पोलीस अंमलदार कौशल्या काळे, सिमा महाजन व पूजा सोनकांबळे यांनी अवघ्या चार महिन्यांत २,०९७ मोटार वाहन कायद्यानुसार केसेस नोंदवत २२,५७,३५० रुपये (बाविस लाख सत्तावन हजार तिनशे पन्नास रुपये) दंड वसूल केला आहे.

**संकल्पनेपासून अंमलबजावणीपर्यंत : एसपींच्या दूरदृष्टीचा परिणाम**

जिल्हा पोलीस अधीक्षक मा. श्री. अजयकुमार बन्सल व अप्पर पोलीस अधीक्षक मा. श्री. आयुष नोपाणी यांच्या कल्पनेतून जालना शहरातील महत्त्वाच्या चौकांमध्ये माईकसह अत्याधुनिक CCTV कॅमेरे बसवण्यात आले.

या कॅमेऱ्यांद्वारे शहरातील प्रत्येक हालचालीवर पोलीस अधीक्षक कार्यालयातील नियंत्रण कक्षातून थेट नजर ठेवली जाते.

यामुळे वाहतूक उल्लंघन तत्काळ निदर्शनास येते घटनास्थळी पोलिस पाठविण्यास विलंब लागत नाही, केवळ प्रत्यक्ष कारवाईऐवजी डिजिटल पुराव्यावर आधारित कारवाई शक्य झाली आहे

**नियंत्रण कक्ष : शहराचा 'मेंदू'**

जालना येथील नियंत्रण कक्षातून ही संपूर्ण यंत्रणा कार्यान्वित आहे. या कक्षावर उपविभागीय पोलीस अधिकारी जालना विभाग अनंत कुलकर्णी व पोलीस निरीक्षक (वाहतूक शाखा) प्रताप इंगळे यांचे थेट नियंत्रण आहे.



याच कक्षात बसून महिला पोलीस अंमलदार कौशल्या काळे, सिमा महाजन व पूजा सोनकांबळे शहरातील प्रत्येक चौकातील CCTV फुटेजवर सतत लक्ष ठेवतात संशयास्पद हालचाली, वाहतूक उल्लंघन, नियमभंग तत्काळ नोंदवून वरिष्ठांना कळवतात.

**आकडे काय सांगतात? (४ महिन्यांचे विश्लेषण)**

एकूण केसेस : २,०९७, एकूण दंड : रु २२,५७,३५०, सरासरी मासिक दंड : सुमारे रु ५.६४ लाख, सरासरी दररोज केसेस : १७ ते १८ हे आकडे दर्शवतात की: शहरात वाहतूक नियमभंग मोठ्या प्रमाणात होत होता. सीसीटीव्ही कारवाईमुळे तो उघडकीस आला नागरिकांमध्ये आता 'कॅमेरा पाहतोय' ही भीती निर्माण झाली आहे.

**उद्घाटनानंतर प्रत्यक्ष परिणाम**

दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी या सीसीटीव्ही प्रणालीचे उद्घाटन जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर सप्टेंबर २०२५ पासून प्रत्यक्ष कारवाईला सुरुवात झाली आणि: सिग्नल तोडणे, हेल्मेटविना वाहन चालवणे, चुकीच्या ठिकाणी पार्किंग, ट्रिपल सीट, नो-एंट्री उल्लंघन अशा प्रकारच्या केसेसमध्ये लक्षणीय वाढ झाली.

वाहतूक विभागाला मोठा दिलासा

याआधी मनुष्यबळ अपुरे, प्रत्येक चौकात प्रत्यक्ष पोलीस तैनात करणे अशक्य, अनेक उल्लंघने नजरेआड, मात्र आता २४ तास डिजिटल नजर, कमी मनुष्यबळात अधिक प्रभावी नियंत्रण. पुराव्यासह कारवाई होत असल्याने पोलीस-नागरिक वादात घट होत आहे. परिणामी वाहतूक विभागाला कायम स्वरूपी मोठा दिलासा मिळाला आहे.

**महिला पोलिसांचा ठसा : 'शिस्तीची सॉफ्ट पण कडक अंमलबजावणी'**

या संपूर्ण कारवाईत महिला पोलीस अंमलदारांनी दाखवलेली सातत्य, अचूक निरीक्षण, जबाबदारीची जाणीव

हे विशेष उल्लेखनीय ठरत आहे. 'तिसरा डोळा' पाहणाऱ्या या महिला पोलिसांमुळे जालना शहरात वाहतूक शिस्तीचा नवा अध्याय सुरू झाला आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

सीसीटीव्ही आधारित वाहतूक नियंत्रण ही संकल्पना केवळ दंड वसुलीसाठी नसून, अपघात कमी करणे, शिस्त निर्माण करणे, स्मार्ट शहराच्या दिशेने पाऊल असा व्यापक उद्देश साध्य करत असल्याचे जालन्यातील उदाहरणातून स्पष्ट झाले आहे.

### जालना महानगरपालिका निवडणूक २०२५

# ४४९ उमेदवार रिंगणात; बहुरंगी लढतींनी राजकीय तापमान वाढणार!

**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिकेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपताच निवडणुकीचे अधिकृत आणि स्पष्ट चित्र समोर आले आहे. एकूण १६ प्रभागांतील ६५ जागांसाठी आता ४४९ उमेदवार निवडणूक रिंगणात असून, माघारीनंतर जवळपास सर्वच प्रभागांत बहुरंगी व चुरशीच्या लढती निश्चित झाल्या आहेत.

दिनांक ०१ व ०२ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या माघारीच्या प्रक्रियेत तब्बल ४०७ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले, त्यामुळे अनेक ठिकाणी थेट लढती तर काही ठिकाणी त्रिकोणी, चौकोणी आणि पंचरंगी राजकीय संघर्ष पाहायला मिळणार आहे.

**आकड्यांमागील राजकारण: प्रत्येक जागेसाठी सरासरी ७ ते ८ उमेदवार**

निवडणूक आयोगाकडे दाखल झालेल्या ८५६ वैध उमेदवारी अर्जांपैकी ४४९ अर्ज अंतिम ठरले आहेत. म्हणजेच, संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रात प्रत्येक जागेसाठी सरासरी ७ ते ८ उमेदवार रिंगणात आहेत. हे प्रमाण पाहता जालना मनपाची ही निवडणूक अत्यंत स्पर्धात्मक ठरणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

**'हॉट सीट' ठरणारे प्रभाग: येथे कोण जिंकणार?**

यंदाच्या निवडणुकीत काही प्रभाग विशेष लक्षवेधी ठरले आहेत- सर्वाधिक उमेदवार असलेले प्रभाग ३ (जागा अ) - १३ उमेदवार, प्रभाग ४ (जागा ड) - १३ उमेदवार प्रभाग १५ (जागा अ ) - १३ उमेदवार या ठिकाणी मतांचे विभाजन मोठ्या प्रमाणावर होण्याची शक्यता असून, अल्पमतातील विजय निर्णायक ठरू शकतो.

थेट लढतीचा प्रभाग: निकाल पटकन स्पष्ट होणार

प्रभाग ६ (जागा इ) येथे फक्त २ उमेदवार रिंगणात असल्याने येथे थेट द्वंद्व युद्ध पाहायला मिळणार आहे. या जागेचा निकाल लवकर लागण्याची शक्यता असून, पक्षीय प्रतिष्ठा पणाला लागलेली आहे.

**कमी उमेदवार असलेले प्रभाग: रणनीती महत्त्वाची**

प्रभाग ५ (जागा उ) - ३ उमेदवार, प्रभाग १४ (जागा इ) - ३ उमेदवार

येथे मतदारांचे कल, स्थानिक समीकरणे आणि उमेदवारांची वैयक्तिक प्रतिमा निकाल ठरवणारी ठरणार आहे.

**पक्षीय समीकरणे: अपक्षांचा प्रभाव वाढणार?**

माघारीनंतर पाहता, अनेक प्रभागांत अपक्ष उमेदवारांची संख्या लक्षणीय आहे. यामुळे प्रस्थापित पक्षांचे मतांचे गणित बिघडण्याची शक्यता काही ठिकाणी अपक्ष 'किंगमेकर' ठरण्याची चिन्हे निवडणुकीनंतर आघाडी व युतीचे राजकारण रंगण्याची शक्यता

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, उमेदवारांना चिन्हांचे वाटप प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून शनिवार (दि ३) रोजी चिन्हा वाटप होणार आहे. त्यामुळे शनिवार पासून जोरदार प्रचाराला सुरुवात होणार असून सभा, रॅली, सोशल मीडिया आणि घराघरांत संपर्क वाढविण्यावर प्रत्येक उमेदवार लक्ष देणार. महानगरपालिकेची ही पहिली निवडणूक असल्याने विकास, पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य व शिक्षण हे मुद्दे प्रचाराच्या केंद्रस्थानी असणार आहेत.

**जालन्याची निवडणूक - प्रतिष्ठेची, चुरशीची आणि निर्णायक**

४४९ उमेदवार, ६५ जागा आणि १६ प्रभाग या आकड्यांमध्येच जालना महानगरपालिकेच्या निवडणुकीची तीव्रता आणि महत्त्व अधोरेखित होते. ऐनवेळी भाजपाा शिवसेनेची युती तुटली आता प्रत्येक प्रभागात भाजपा आणि शिवसेना आमने सामने आहेत. त्यातच काँग्रेस, शिवसेना (उद्धव ठाकरे) आणि राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) यांची महाविकास आघाडी व राष्ट्रवादी (अजित पवार) व मनसेची युती जास्तीत जास्त उमेदवार दिले असून एआयएमआयएम व वंचित बहुजन आघाडीने जवळपास सतरा ठिकाणी उमेदवार उभे केले आहे.

मतदारांचा कौल कोणाच्या बाजूने झुकतो, हे येत्या निकालातून स्पष्ट होईल; मात्र सध्या तरी जालन्यातील राजकीय वातावरण तापलेले असून निवडणूक रणसंग्राम शिगेला पोहोचला आहे.

प्रभागनिहाय विश्लेषण

**प्रभाग १**

एकूण उमेदवार : २९

हा प्रभाग पारंपरिकदृष्ट्या मिश्र मतदारसंघ मानला जातो. येथे पक्षीय मतांबरोबरच स्थानिक नेतृत्वाला मोठे महत्त्व आहे. अपक्ष उमेदवार मतविभाजन करणाऱ्यास सक्षम ठरल्यास विजयाचा फरक कमी राहण्याची शक्यता असून अपक्षांची दाळ न शिजल्यास या प्रभागाती लढत एकतर्फी होण्याची शक्यता आहे.

**प्रभाग २**

एकूण उमेदवार : २६

येथे सत्ताधारी विरुद्ध विरोधक अशी थेट छुपी लढत आहे. अल्पसंख्याक व मध्यम वर्गीय मतदार निर्णायक भूमिका बजावू शकतात.

**प्रभाग ३**

**एकूण उमेदवार : ३८ (हॉट प्रभाग)**

हा प्रभाग निवडणुकीचा हॉटस्पॉट ठरणार आहे. मोठ्या पक्षांबरोबरच अपक्षांची संख्या जास्त असल्याने मतांचे प्रचंड विभाजन होण्याची शक्यता. येथे कोण जिंकणार यापेक्षा कोण हरवणार हे सांगणे अवघड.

**प्रभाग ४**

**एकूण उमेदवार : ३९**

हा प्रभाग राजकीय प्रतिष्ठेचा मानला जात आहे. येथे आघाडी, भाजपा, शिवसेना आणि एमआयएम आमने-सामने, प्रचारात आरोप-प्रत्यारोप वाढण्याची शक्यता. त्यातल्या त्यात सर्वच पक्षांनी मुस्लीम उमेदवारांना येथे प्राधान्य दिले आहे. मुस्लीमबहुल प्रभाग असल्याने त्यांची मतदान निर्णायक ठरणार आहे.

**प्रभाग ५**

एकूण उमेदवार : २३

कमी उमेदवार असलेला प्रभाग. येथे स्थानिक प्रश्न, वैयक्तिक संपर्क आणि समाजघटक निकाल ठरवतील. माजी आमदार कैलास गोरंट्याल यांचे पूत्र अक्षय गोरंट्याल या प्रभागातून मैदानात आहे. त्यामुळे हा प्रभाग चर्चेत राहण्याची शक्यता आहे.

**प्रभाग ६**

एकूण उमेदवार : १६

काही जागांवर थेट लढत असल्याने निकाल तुलनेने स्पष्ट राहण्याची शक्यता. पक्षीय शिस्त आणि संघटन याची खरी कसोटी. या प्रभागात माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्या पत्नी माजी नगराध्यक्ष सौ. संगीता गोरंट्याल या प्रभागातून मैदानात आहे. प्रभाग पाच पेक्षाही म्हणजे सर्वाधिक चर्चेत हा प्रभाग राहणार आहे.

**प्रभाग ७**

एकूण उमेदवार : २६

युवक आणि महिला मतदारांचे प्रमाण जास्त. विकास विरुद्ध अनुभव असा प्रचाराचा मुद्दा ठरण्याची शक्यता.

**प्रभाग ८**

एकूण उमेदवार : २८

एका जागेवर ११ उमेदवार असल्याने मतफुटीचा सर्वाधिक धोका. अपक्ष 'किंगमेकर' ठरू शकतात.

**प्रभाग ९**

एकूण उमेदवार : २२

तुलनेने शांत प्रभाग, पण शेवटच्या टप्प्यात प्रचार रंगणार. स्थानिक नाराजी महत्त्वाची ठरणार.

**प्रभाग १०**

एकूण उमेदवार : ३४

शहरी समस्या - पाणी, रस्ते, स्वच्छता - केंद्रस्थानी. सर्वाधिक उमेदवार असल्याने या प्रभागात विजयाचे अंतर कमी राहण्याची शक्यता असून या ठिकाणाहून नवीन चेहऱ्यास संधी अथवा कमी अधिक फरकामुळे उमेदवारांची मोठी परिक्षा मतदार घेणार आहे.

**प्रभाग ११**

एकूण उमेदवार : ३२

राजकीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशील प्रभाग. जातीय व सामाजिक समीकरणांचा प्रभाव.

**प्रभाग १२**

एकूण उमेदवार : २२

येथे स्थिर मतदान पॅटर्न दिसतो. पक्षांपेक्षा उमेदवाराची ओळख महत्त्वाची.

**प्रभाग १३**

एकूण उमेदवार : ३२

शहरी मिश्र प्रभाग. विकासकामांचा हिशेब मतपेटीत दिसण्याची शक्यता.

**प्रभाग १४**

एकूण उमेदवार : २१

काही जागांवर फक्त ३ उमेदवार. येथे थेट आणि सोपी लढत.

**प्रभाग १५**

एकूण उमेदवार : ३३

प्रतिष्ठेचा आणि चर्चेचा प्रभाग. वरिष्ठ नेत्यांची लक्षवेधी गुंतवणूक.

प्रभाग १६

एकूण उमेदवार : ३१

अंतिम टप्प्यात रंगणारा प्रचार. तरुण उमेदवारांची कामगिरी निर्णायक.

**पक्षनिहाय बलाबल**

भाजप

**बळकट बाजू** - संघटन मजबूत, मतदारांमध्ये प्रभाव, प्रचारयंत्रणा सक्षम

**कमकुवत बाजू**

काही प्रभागांत अंतर्गत नाराजी, अपक्षांमुळे मतफूट

**शिवसेना**

**बळकट बाजू -** स्थानिक आमदार पक्षाचा., मजबूत संघटन, उमेदवार निवडतांना घेतलेली काळजी.

कमकुवत बाजू

अंतर्गत नाराजी, उमेदवारी न मिळालेल्या उमेदवारांची नाराजी. अतिआत्मविश्वास.

**काँग्रेस - राष्ट्रवादी (आघाडी)**

**बळकट बाजू**

पारंपरिक मतदार, काही प्रभागांत मजबूत स्थानिक नेते

**आव्हाने**

संघटनातील विस्कळीतपणा, प्रचारात आक्रमकतेचा अभाव,

**एमआयएम / वंचित व इतर पक्ष**

**बळकट बाजू**

ठरावीक मतदारसंघात प्रभाव, शिस्तबद्ध मतदान, मर्यादा

**कमकुवत बाजु**

सर्व प्रभागांत उपस्थिती नाही

**अपक्ष उमेदवार**

यंदाच्या निवडणुकीतील सर्वात मोठा 'फॅक्टर', अनेक प्रभागांत निकाल बदलण्याची ताकद, निवडणुकीनंतर सत्ता स्थापनेत महत्त्वाची भूमिका शक्य

जालना महानगरपालिकेची ही निवडणूक पक्षांपेक्षा उमेदवार, संघटन आणि स्थानिक मुद्द्यांवर अधिक अवलंबून आहे. बहुरंगी लढती, अपक्षांचा प्रभाव आणि थेट संघर्ष यामुळे ही निवडणूक राजकीयदृष्ट्या अत्यंत रोचक व अनिश्चित ठरणार आहे.

# मनपा निवडणुकीचा गाडा करदात्यांच्या पैशातून हाकला जातोय!

**जालना । प्रतिनिधी** - राज्यातील २९ वी महानगरपालिका म्हणून अस्तित्वात आलेल्या जालना शहर महानगरपालिकेची पहिलीच निवडणूक सध्या चर्चेत आहे. मात्र, ही निवडणूक एका वेगळ्याच आर्थिक संकटामुळे गाजत आहे. निवडणूक खर्चासाठी शासनाकडून मिळणारा निधी अद्याप प्राप्त न झाल्याने पालिकेची कोंडी झाली होती. अखेर शहरातील करदात्या नागरिकांनी भरलेल्या कराच्या पैशातून या निवडणुकीचा गाडा हाकण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

निधीची चणचण: जालना मनपाच्या पहिल्याच निवडणुकीसाठी सुमारे ७ कोटी ४० लाख रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे.

शासनाकडून प्रतीक्षा: राज्य शासनाकडे वारंवार मागणी करूनही निवडणुकीचा निधी, जीएसटी आणि स्टॅम्प ड्युटीचा परतावा अद्याप मिळालेला नाही.

करदात्यांची साथ: प्रशासनाने राबविलेल्या विशेष करवसुली मोहिमेला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यातून आतापर्यंत ३ कोटी ५० लाख रुपये जमा झाले आहेत. निधीची कमतरता लक्षात घेता, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी निवडणूक खर्चात मोठी कपात करण्याचे आदेश दिले आहेत.

जिल्हाधिकारी तथा मनपा आयुक्त आशिमा मित्तल यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, शासनाकडून निधी मिळण्यास विलंब होत असला तरी, करवसुलीच्या माध्यमातून पालिकेकडे पैसे जमा झाले आहेत. याच निधीतून आम्ही निवडणुकीचा खर्च भागवणार आहोत. तसेच, ही निवडणूक अत्यंत काटकसरीने आणि उत्तम रितीने पार पाडण्याचा आमचा प्रयत्न आहे.

येत्या १५ जानेवारीला मतदान होणार असून, प्रशासनाने आता पूर्णपणे कंबर कसली आहे. सरकारी मदतीची वाट न पाहता स्थानिक पातळीवर जमा झालेल्या निधीतून ही पहिली ऐतिहासिक निवडणूक पार पडणार आहे.




# स्टेअर्स राज्यस्तरीय कराटे स्पर्धेसाठी जालना संघ रवाना



**जालना । प्रतिनिधी -** मुंबई विरार येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कराटे चॅम्पियनशिप साठी जालना जिल्हा कराटे संघ सेन्साई रुपेन्द्र गोपाल पारचा यांच्या मार्गदर्शनात निघाले. राज्यस्तरीय स्पर्धेसाठी रवाना झालेला संघ खालील प्रमाणे आहे कु. निवांशी वलकट्टी, कु. अनुष्का म्हेत्रे, कु. आरुषी वलकट्टी, तन्वी खरटमल, कु. वैष्णवी लोखंडे, आकांक्षा चिल्का, दिव्यता कोठारी, कु. वैष्णवी लुटे, कु. पूर्वा माने, कु. लावण्या गुडला, ऋषिकेश श्रीराम, यशवर्धन चिल्का, शेलमॉन गुडेकर, नयन गोमतीवाले हे खेळाडू वेगवेगळ्या वयोगटात व वजन गटात जालना जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील

विद्यार्थ्यांना सेन्साई रुपेन्द्र गोपाल पारचा व सेन्साई अमन रुपेन्द्र पारचा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना स्टेअर्स जिल्हाध्यक्ष दीपक शेळके, महावीर ढक्का, राजेश राऊत, संजय भगत, रितेश अग्रवाल, श्री.म. स्था जैन विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री वानगोता, श्री. म. स्था जैन प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती पोरवाल मॅडम, नारायणा ई टेक्नो स्कूल ची मुख्याध्यापिका श्रीमती अर्चना पवार, नारायणा ई टेक्नो स्कूलचे डीन व्यंकट राजू गुडला, सचिन खर्डेकर, रितेश जयस्वाल, गणेश चिप्पा व पालक वर्ग यांनी कौतुक करून पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### उसतोड कामगारांसाठी समूहउपदेशन कार्यक्रम संपन्न

# आरोग्य पोषन शिक्षण बाबत समुपदेशन; १५१ मुले शिक्षणाच्या प्रवाहात

**परतुर । प्रतिनिधी -** हंगामी स्थलांतर करणाऱ्या उसतोड कामगारांच्या मानसिक, सामाजिक व कौटुंबिक समस्या लक्षात घेता त्यांना आरोग्य पोषन शिक्षण याचे मार्गदर्शन व आधार मिळावा या उद्देशाने समूहउपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आला.

या समूहउपदेशनामध्ये उसतोड कामगारांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. कामाच्या ताणतणावामुळे उद्भवणाऱ्या मानसिक अडचणी, कुटुंबापासून दूर राहण्याची वेदना, आर्थिक अडचणी, व्यसनाधीनता, आरोग्य शिक्षण विषयक समस्या तसेच मुलांच्या शिक्षणाबाबतच्या चिंता या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.

तज्ज्ञ समुपदेशकांनी संवादात्मक पद्धतीने कामगारांचे प्रश्न ऐकून घेत सकारात्मक विचारसरणी, तणाव व्यवस्थापन, कौटुंबिक संवाद, व्यसनमुक्ती व आरोग्याची काळजी याबाबत मार्गदर्शन केले. समूहचर्चेमुळे कामगारांना एकमेकांचे अनुभव ऐकण्याची व आपले मन मोकळे करण्याची संधी मिळाली. या उपदेशनामुळे कामगारांमध्ये आत्मविश्वास वाढला असून मानसिक स्वास्थ्य जपण्यासाठी अशा प्रकारचे कार्यक्रम नियमितपणे राबविण्याची गरज असल्याचे मत सहभागी कामगारांनी व्यक्त केले.या मार्गदर्शक मा अप्पासाहेब उगले प्रकल्प संचालक मा भाउसाहेब गुजाळ जिल्हा संपर्क अधिकारी प्रकल्प व्यवस्थापक अश्वजित जाधव कार्यक्रमाच्या यशस्वी साठी जिल्हा समन्वयक एकनाथ राउत राजेश वाघमारे सुरेखा वाघमारे दुर्गा नाडे आकाश चैगुलै महादेव खरात योगेश आढे हे उपस्थित होते.

# स्वच्छता मोहिमेदरम्यान जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केली मतदार जनजागृती

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील वीर सावरकर चौक येथे आयोजित स्वच्छता मोहिमेदरम्यान तथा जिल्हाधिकारी व आयुक्त जालना शहर महानगरपालिका आशिमा मित्तल यांच्या उपस्थितीत मतदान जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला.

यावेळी नागरिकांना मतदान करणेबाबत शपथ देण्यात आली तसेच स्वाक्षरी मोहिमेच्या माध्यमातून मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. लोकशाही मजबूत करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपला मतदानाचा हक्क बजावावा, मतदान हे केवळ अधिकार नसून कर्तव्यही आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी व आयुक्त आशिमा मित्तल यांनी यावेळी केले.

स्वच्छता आणि लोकशाही या दोन्ही बाबी नागरिकांच्या सक्रिय सहभागातूनच यशस्वी होतात, असे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास शहरातील नागरिक, विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी तसेच स्वीप (SVEEP) टीमचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी उत्स्फूर्तपणे मतदान करणार अशी शपथ घेतली व स्वाक्षरी मोहिमेत सहभाग नोंदविला.

सदर उपक्रमामुळे नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता वाढीस लागून जालना शहर महानगरपालिकेसाठी दि. १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या मतदान प्रक्रिया पार पडणार असून निश्चितच या निवडणुकीत मतदान टक्केवारी वाढीस चालना मिळेल, असा विश्वास प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आला.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.